## निशाणी क्र. ८ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. **अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात खालील प्रमाणे –**

अर्जदाराचे कथन आहे की, अर्जदार क्र. १ व २ एकमेकांचे पती–पत्नी आहे. तर गैरअर्जदार हे त्यांचे सज्ञान मुले आहेत. अर्जदारांच्या मते त्यांनी गैरअर्जदारांना त्यांची शेती वाटून दिली आहे. परंतू सध्या ते अर्जदाराचा सांभाळ करण्यास तयार नाहीत. अर्जदार हे वयोवृध्द आहेत. त्यांच्याकडे गैरअर्जदाराने दुर्लक्ष केले आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांच्या खाण्यापिण्याचे, कपडयालत्त्याचे अथवा वैदयकीय गरजांची कोणतीही पुर्तता केली नाही व करत नाही. अर्जदार हे त्यांच्या स्वतःचा उदरनिर्वाह करण्याच्या वृध्दापकाळामुळे असमर्थ आहेत. गैरअर्जदाराकडे शेती आहे. तसेच ते गायी व म्हशीच्या व्यवसायातून उत्पन्न घेतात. गैरअर्जदाराचे प्रत्येकी दोन लाखपेक्षा जास्त उत्पन्न आहे. म्हणुन गैरअर्जदार हे अंतरीम पोटगी रूपये ५०००/– प्रत्येकी अर्जदारास देउ शकतात. म्हणून त्यांनी अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

०३. गैरअर्जदार १ व २ चे वतीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे मांडण्यात आले. त्यांनी अर्जातील कथने नाकारले आहेत. अर्जदार क्रं. १ व २ ने त्यांच्या कुटूंबातील शेतीच्या वाटणीच्या वेळी गट क्र. ९४ मध्ये त्यांच्याकडे अनुक्रमे ८८ आर व ६१ आर जमीन ठेवली आहे. अर्जदाराला त्या शेतीतुन भरपुर उत्पन्न मिळते. गैरअर्जदारांकडे पुरेशी शेती नाही व ते मजुरी करून आपला उदरनिर्वाह भागवतात. म्हणून गैरअर्जदार क्र. १ व २ ने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

गैरअर्जदार क्रं. ३ ने नि.क्र. १० वर पुरसीस दाखल केली आहे व त्याने अर्जदाराने दाखल केलेले प्रकरणातील बाबींविषयी त्याला काहीही कथन करायचे नाही असे नमुद केले.

०४. दोन्ही बाजूंचे म्हणेण ऐकले असता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होत असून, त्यावरील निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या कारणांसाठी नोंदवित आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही अर्जात उल्लेखल्याप्रमाणे अंतरीम दाद मिळण्यास पात्र आहे काय ? | अंतरीम पोटगी दरमहा रु. १५००/– प्रत्येकी |
| २ | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

# कारणमीमांसा

**०५. मुद्दा क्र. १ करिता :–**

प्रस्तुत प्रकरणातील नातेसंबंधाविषयी कोणताही वाद नाही. अर्जदार क्रं.१ हा अर्जदार क्रं. २ चा पती आहे. अर्जदार क्रं. १ चे सध्याचे वय ७५ तर अर्जदार क्रं. २ चे सध्याचे वय ७० वर्ष नमुद केले आहे. गैरअर्जदार क्रं. १ ते ३ हे अर्जदाराचे सज्ञान मुले आहेत.

अर्जदाराच्या वतिने युक्तिवाद करण्यात आला की, गैरअर्जदाराकडे भरपूर पैशे आहेत. गैरअर्जदाराकडे पुरेशी शेती आहे. तसेच ते गुराढोरांच्या व्यवसायातुन सुध्दा उत्पन्न मिळवितात. त्यातून गैरअर्जदारांना वार्षीक जवळपास दोन लाख रूपये प्रत्येकी उत्पन्न मिळते. गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी अंतरिम रु. ५०००/– खावटी देऊ शकतात. गैरअर्जदाराचे विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, सदरील अर्ज हा प्रकरण लांबवण्याच्या उद्देशातुन केलेला आहे. त्याची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. गैरअर्जदार हे मजूरी करुन जिवन जगत असल्यामुळे अर्जदारास अंतरीम पोटगी देऊ शकत नाहीत. गैरअर्जदाराच्या विधीज्ञांनी अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०६. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद व कथनाचे सत्यता पाहण्याकरिता व तसेच अंतरिम पोटगी अर्जाच्या अनुषंगाने काही बाबी पहाव्या लागतील. सर्वप्रथम ही बाब विचारात घेतली पाहिजे की अर्जदार हे गैरअर्जदाराचे वयोवृध्द आईवडील आहेत. गैरअर्जदाराने त्याच्या से मध्ये असे प्रतिपादन केले आहे की त्यांच्या कुटूंबाची शेतीची वाटणी झालेली आहे व त्यामध्ये अर्जदाराने त्यांच्याकडे काही जमिन ठेवली आहे. उलट अर्जदाराच्या मते त्यांनी मुलांना शेती वाटून दिल्यापासून ते त्यांच्या कोणत्याही दैनंदिन गरजा पुरवत नाहीत. गैरअर्जदाराने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराकडे शेती असल्याचे कथन केले आहे परंतू अर्जदारांना वृध्दा अवस्थेत शेती करता येती का, याबददल काहीही कथन केले नाही. तसेच अर्जदार शेती बटावणी अथवा ठोक्याने करून घेतात का यासंदर्भात कोणताही उल्लेख केलेला नाही. अर्जदारांचे वय लक्षात घेता त्यांच्याकडून आजरोजी शेती व्यवसाय करणे प्रथम दृष्टया शक्य दिसत नाही. त्यामुळे अर्जदाराकडे उत्पनाचे कुठलेही साधन असल्यासंदर्भात प्रथमदर्शनी काहीही आढळून येत नाही.

०७. याउलट गैरअर्जदार ही अर्जदाराची सज्ञान मुले आहेत व ती शारीरीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच त्यांनी त्याच्याकडे काही प्रमाणात शेती असल्याचे सुध्दा त्यांच्या म्हणणे अथवा से मध्ये नमुद केले आहेत. त्यामुळे गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. गैरअर्जदार हे मजुरी करत असल्याचे गृहीत धरण्यात येईल. त्यांना प्रत्येकी २०० ते ३०० रूपये प्रतीदीन रोजंदारी मिळु शकते.

०८. अर्जदार हे गैरअर्जदाराचे वयोवृध्द आईवडील असल्यामुळे त्यांना सांभाळण्याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदारांवर आहे. अर्जदारांकडे उत्पन्नाचे प्रथमदर्शनी कोणतेही साधन असल्याचे दिसून येत नाही. गैरअर्जदार क्रं. १ ते ३ त्यांनी अर्जदारांच्या खाण्यापिण्याचे, कपडयालत्त्याचे अथवा वैदयकीय गरजांची कोणतीही पुर्तता केली अथवा करत आहे यासंदर्भात् काहीही नमुद केले नाही. त्यामुळे गैरअर्जदाराने त्यांच्या आईवडीलांना दुर्लक्षित केल्याचे दिसून येते. अर्जदार हे त्यांच्या स्वत:चा उदरनिर्वाह करण्याच्या वृध्दापकाळामुळे असमर्थ आहेत. त्यामुळे गैरअर्जदार क्रं. १ ते ३ हे अर्जदारास अंतरिम पोटगी देण्यास जबाबदार ठरतात. अर्जदाराने गैरअर्जदारांडून रु. ५०००/– प्रत्येकी प्रति महिना अंतरिम पोटगी मागीतलेली आहे. गैरअर्जदार क्र. १ ते ३ चे उत्पन्न किती आहे या संदर्भात अभिलेखावर आजरोजी ठोस पुरावा नाही. ही बाब विचारात घेता, गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे मजूरी व्यवसाय करीत असल्याचे आपण गृहीत धरले तरी हा अर्जदारास निश्चितच रु. १,५००/– प्रत्येकी दरमहा अंतरिम पोटगी देऊ शकतो असे वाटते. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ हे या अर्जाचा निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार क्र. १ यांचेकडून रु. १५००/– प्रत्येकी दरमहा अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

०९. <u>मुद्दा क्र. २ करिता :–</u>

उपरोक्त मुद्दा क्र. १ वर नोंदविलेल्या कारणांवरुन अर्जदाराचा अर्ज हा अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. उपरोक्त विवेचनावरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो
२. गैरअर्जदार क्र. १ ते ३ ने अर्जदार क्र. १ व २ यांना अर्ज दाखल तारखेपासून ते मुख्य अर्जाचा निकाल लागेपावेतो दरमहा रु. १,५००/– प्रत्येकी अंतरिम पोटगी द्यावी.
३. या अर्जाचा खर्च अंतिम निकालाच्या वेळेस ग्राह्य धरण्यात येईल

Digitally signed by Shankar Baburao Ambhore
Date: 2019.12.17 15:20:53 +0530

दिनांक १३.१२.२०१९

(शं. बा. अंभोरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोणार

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईलमधील आदेशाचा/ न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – शं. बा. अंभोरे,
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोणार.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक, ग्रेड–३, लोणार.

दिनांक १३.१२.२०१९